**<u>सांगोला येथील दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर यांचे न्यायालयात.</u>**

**<u>नियमीत दिवाणी दावा क्र. ४३०/२०१६ मधील नि. क्र. ४९ खालील आदेश</u>**

(मोहन भोसले विरुध्द बाळु भोसले )

**CNR NO. MHSO**2000-3805-2015

वादी यांनी प्रस्तुत दुय्यम पुरावा दाखल करण्यास परवानगी मिळणेकामी दाखल केला आहे.

०२. अर्जात वादीचे कथन की, सदर कामी यातील वादी यांनी जाहीर ठराव व वाटप होवून मिळणेसाठी दावा दाखल केला आहे. प्रतिवादी क्र. १ यांनी दावा मिळकतीबाबत बेकायदेशीर खरेदीखताचा दस्त प्रतिवादी क्र. ६ यांना नोंदवून दिलेला आहे. सदरचे खरेदीखत हे बेकायदेशीर असल्याचे वादीने ठरवून मागितले आहे. खरेदीखत क्र. ३७५२/२००८ ची मुळ प्रत प्रतिवादी क्र. ६ यांचे ताब्यात आहे. प्रतिवादी क्र. ६ यांना त्याबाबत नोटीस बजावणी होवूनही त्यांनी सदरचा दस्त दाखल केलेला नाही. वादी यांनी नि. ४ सोबत अ. क्र. ४ वरती सदर खरेदीखताची प्रमाणित प्रत दाख्ला केली आहे. त्यामुळे सदर खरेदीखताचे प्रमाणित प्रतिस दुय्यम पुरावा म्हणून ग्राहय धरण्यात यावे अशी विनंती केली आहे.

०३. प्रतिवादी क्र. ६ तर्फे सदर अर्जास म्हणणे दिले की, वादीचा अर्ज कायदेशीर नाही. सबब, अर्ज नामंजूर करणेत यावा अशी विनंती केली.

०४. वादी आणि प्रतिवादींतर्फे विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. कागदपत्रांचे अवलोकन केले. वादीने प्रस्तुतचा दावा जाहीर ठराव व वाटप होवून मिळणेसाठी दाखल केलेला आहे. वादी यांनी नि.नं. ४ वरील अ. क्र. ४ येथे खरेदी दस्त क्र. ३७५२/२००८ ची प्रमाणित प्रत दाखल केली आहे. वादीने सदर दस्त दाव्याचे

कामी दुय्यम पुरावा म्हणून विचारात घेणेविषयी विनंती केली आहे. प्रस्तुत दावा हा स्थावर मिळकतीसंदर्भात असून त्यामध्ये वादी व प्रतिवादी यांचे मौल्यवान हक्क व अधिकार गुंतलेले आहेत. वादी यांनी त्यांचे कथनाचे पुष्टयर्थ नि. ५० वर प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. शिवाय, दाखल केलेली कागदपत्रे ही बनावट आहेत असे प्रतिवादींचे कथन नाही. प्रस्तुत अर्ज मंजूर केल्यास प्रतिवादींचे नुकसान होणार नाही, याउलट अर्ज नामंजूर केल्यास वादींचे अपरीमित नुकसान होणार आहे. तसेच प्रस्तुत अर्जामध्ये संयुक्तीक कारण दिले आहे. सबब, अर्ज मंजूर करणे न्यायोचित होईल. करीता मी खालील आदेश देत आहे

## आ दे श

१. वादीचा अर्ज (नि. ४९) मंजूर करणेत येतो.

२. वादीने दुय्यम पुरावा शाबित करण्याकरीता भारतीय पुरावा कायद्याप्रमाणे योग्य ती पुर्तता करावी.

POTDAR BHAGYASHRI MADHUKAR

Digitally signed by POTDAR BHAGYASHRI MADHUKAR
Date: 2025.03.12 10:16:47 +0530

दिनांक – ११/०३/२०२५

( सौ. बी. एम. पोतदार )
दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर,
सांगोला.

## C E R T I F I C A T E

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of Stenographer | : | Shri. A. A. Chavan. |
| (b) | Court | : | Mrs. B. M. Potdar, Civil Judge, J. D.& J. M. F. C. Sangola |
| (c) | Judgment /Order signed by P.O. on | : | 11-03-2025 |
| (d) | Judgment /Order uploaded on | : | 11-03-2025 |